स्थायी समितीच्या **शनिवार दिनांक 18–03–2017** रोजी **दुपारी 03–00** वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| **1.** | **श्री. संदिप चंद्रभान जाधव** | **सभापती** |
| 2. | श्रीमती संगीता दिपक गिऱ्हे | सदस्या |
| 3. | श्रीमती रिता अशोक मुळे | सदस्या |
| 4. | श्रीमती उषा टॉबी पॅलट | सदस्या |
| 5. | श्रीमती दुर्गा चंद्रभुषण हत्तीठेले | सदस्या |
| 6. | श्रीमती भाग्यश्री गणेश कानतोडे | सदस्या |
| 7. | श्रीमती नेहा नरेन्द्र वाघमारे | सदस्या |
| 8. | श्रीमती सरला कमलेश नायक | सदस्या |
| 9. | श्रीमती मनिषा सुनिल कोठे | सदस्या |
| 10. | श्रीमती सरिता ईश्वर कावरे | सदस्या |
| 11. | श्रीमती लता सुनिल काडगाये | सदस्या |
| 12. | श्रीमती जयश्री मोहन वाडीभस्मे | सदस्या |
| 13. | श्री. जितेन्द्र भास्कर घोडेस्वार | सदस्य |

## उपस्थित अधिकारी

1. श्री. श्रावण हर्डिकर, आयुक्त
2. श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

ठराव क्रमांक 03:– {आरोग्य विभाग} स्थायी समिती ठराव क्रमांक १६८ दिनांक ३१/०५/२०१६ अन्वये आरोग्य विभागाकरिता जंतुनाशक साहित्य खरेदीच्य निविदा दरकरार दोन वर्षाकरिता मागविण्यात आल्या असुन खालील निम्नतम दरानुसार प्रस्तावित आहे

.

| अ. क्र. | निविदाकाराचे नांव | साहित्याचे नाव | निम्नतम दर प्रती लिटर/किलो | आवश्यक संख्या | खर्च एकुण |
|---|---|---|---|---|---|
| १ | में. डॉल्फीन सेल्स कॉपोरेशन ठाणे | Nuvan 76% EC | 500 Ltr. | रु. 835/– | 4,17,500/- |
| २ | में. डॉल्फीन सेल्स कॉपोरेशन ठाणे | Pyrosene Oil CIB Registration & ISI mark | 1200 Ltr. | रु. 700/– | 8,40,000/- |
| ३ | में. डॉल्फीन सेल्स कॉपोरेशन ठाणे | Temegaurd 50% EC(Temegaurd 50% EC) CIB Registration & ISI mark | 800 Ltr. | रु. 1450/– | 11,60,000/- |
| ४ | में. डॉल्फीन सेल्स कॉपोरेशन ठाणे | Pyrethrum 2% Ext. CIB Registration & ISI mark | 150 Ltr. | रु. 2185/– | 3,27,750/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ५ | में. डॉल्फीन सेल्स कॉर्पोरेशन ठाणे | Soap 125 Gm | 8000 Ltr. | रु. 30/— | 2,40,000/- |
| ६ | में. डॉल्फीन सेल्स कॉर्पोरेशन ठाणे | A quation TMFI/Green B | 200 Ltr. | रु. 4945/— | 9,89,000/- |
| ७ | में. डॉल्फीन सेल्स कॉर्पोरेशन ठाणे | Lakshaya (Delfamethrin 1.25 ulv) Registration & ISI mark | 150 Ltr. | रु. 2150/— | 3,22,500/- |
| ८ | में. डॉल्फीन सेल्स कॉर्पोरेशन ठाणे | Citronella Oil | 400 Ltr. | रु. 840/— | 3,36,000/- |
| ९ | में. रमेश ॲग्रो केमी कॉ. ठाणे | Lakshaya (Delfamethrin 1.25 ulv) Registration & ISI mark | 150 Ltr. | रु. 2150/— | 3,22,500/- |
| १० | में. रमेश ॲग्रो केमी कॉ. ठाणे | Baculluis Thurengsisies Isaratensis BIT H-14 in Aques Suspension approved & recomanded by NVBD Cp/TAC | 1000 Ltr. | रु. 1495/— | 14,95,000/- |
| ११ | में. रमेश ॲग्रो केमी कॉ. ठाणे | Black Phenyle grade-1 RWC IB ISI Mark | 5000 Ltr. | रु. 130/— | 6,50,000/- |
| १२ | में. रमेश ॲग्रो केमी कॉ. ठाणे | Flygone CIB Registration & ISI mark | 500 Ltr. | रु.825/— | 4,12,500/- |
| १३ | में. रमेश ॲग्रो केमी कॉ. ठाणे | Neomtex (CBI Registration) | 1000 Ltr. | रु. 910/— | 9,10,000/- |
| | | एकुण रक्कम | | | **84,22,750/—** |

वर नमुद निम्नतम दरावर एकूण १३ साहित्यांच्या नावासमोर नमुद निविदाकारा कडून वर्ष २०१६—१७ च्या खरेदीवर वार्षिक रुपये ८४,२२,७५०/— खर्च अपेक्षित हा खर्च पद क्रमांक २०६ व ६०६ A२३१०१२२२७०२—A४४२०१२७२२०२ किंवा इतर पदामधुन भागविण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठरव क्रमांक 04:—</u> {पेंच प्रकल्प} महानगरपालिकेच्या विविध धोरणांची प्रभावी व त्वरीत अंमलबजावणी करणे, केंद्र व राज्यसरकारच्या विविध योजनांची अंमलबजावणी करणे, विविध विषयांवर धोरणांचे मसुदे बनविणे, उपविधीचे, निविदांचे तसेच करारनाम्यांचे मसुदे बनविणे इत्यादी महत्वाच्या कामांकरीता महानगरपालिकेमधे पुरेसे सक्षम मनुष्यबळ नसल्यामुळे Management Support Unit निर्माण करण्याच्या रु. 10,28,750/— प्रतिमाह प्रमाणे तीन वर्षांकरीता येणाऱ्या रु. 3,70,35,000/— कामास मंजुरी देण्याचा व केंद्र व राज्यशासनाच्या Empanelled Agencies कडून निविदा मागविण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 05:—</u> {वित्त विभाग} महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 2011 चे कलम 95 अन्वये नागपूर महानगरपालिकेचे अंदाजपत्रक मा. आयुक्तांद्वारा स्थायी समिती द्वारा मंजुरीकरिता सादर करणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने सन 2016—2017 चे सुधारीत व सन 2017—2018 चे प्रस्तावित अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले असून स्थायी समितीच्या मंजुरीचा प्रश्न समितीने विचारात घेऊन नागपूर महानगरपालिकेचे सन 2016—2017, आयुक्त यांचे द्वारे सादर केलेल्या सुधारीत

व सन 2017–2018 चे प्रस्तावित अंदाज पत्रकात दुरुस्ती व फेरबदल करण्याचे अधिकार मा. अध्यक्ष, स्थायी समिती यांना देण्यास ही स्थायी समिती एकमताने मंजूरी प्रदान करते. तसेच केलेल्या दुरुस्ती व फेरबदलास म.न.पा. महासभेसमोर मंजूरीसाठी शिफारस करण्यास्तव पाठविण्याचे अधिकारी मा. अध्यक्ष, स्थायी समिती यांना देण्यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 06** :– आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

सभापती
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर